RNI No. MAHBIL/2009/31748
Reg. No. MCS/174/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ४०] मंगळवार, ऑगस्ट २, २०१६/श्रावण ११, शके १९३८ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ५६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

## नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ ऑगस्ट २०१६

### अधिसूचना

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक स्थासंक-२०१६/प्र.क्र. २६/२०१६/(नवि-३२).— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या पुढील नियमांचा मसुदा त्याद्वारे बाधा पोचण्याची शक्यता असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, दिनांक १४ ऑगस्ट २०१६ रोजी किंवा त्यानंतर उक्त मसुदा महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उक्त मसुदा वरील कालावधी समाप्तीच्या पूर्वी सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे पोस्टाने किंवा ईमेल द्वारे *sudhakar.bobade@nic.in* किंवा SMS द्वारे मोबाईल क्रमांक ९८२०५२७७३७ यावर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती व सूचनांवर शासनाकडून विचार करण्यात येईल.

### अधिसूचनेचा मसुदा

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० च्या नियम ३ मधील उप नियम (१) मध्ये खालील परंतुक दाखल करण्यात येत आहे :—